# <u>रामाला वनवास</u>

मिथिला नगरीत श्रीराम आणि सीतेचा विवाह मोठा थाटाने पार पडला. राम आणि सीता तसेच लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न देखील आपल्या पत्नींना घेऊन अयोध्येला परत आले. अयोध्येची प्रजा अतिशय आनंदित झाली.

असेच आणखी काही दिवस गेले. दशरथ राजा आता म्हातारा झाला होता. त्याने विचार केला की आपण आता राज्याच्या काराभारातून निवृत्त व्हावे आणि रामाने अयोध्येचा राजा व्हावे. हा विचार त्याने ज्येष्ठ मंत्र्यांना बोलून दाखविला. राम सर्वांनाच प्रिय होता. त्यामुळे तो विचार सर्वांनाच खूप आवडला. मग सर्वांच्या <u>संमतीने</u> दशरथाने निर्णय घेतला की रामाला राज्याभिषेक करायचा.

राणी कैकेयीची एक दासी होती. तिचे नाव मंथरा. तिला मात्र हे आवडले नाही. ती कैकेयीच्या प्रासादात गेली. तिने कैकेयीला रामाच्या अभिषेकाची वार्ता सांगितली. ती म्हणाली, "राम राजा झाला तर भरत त्याचा दास होईल. तू रामाची दासी होशील. खरं तर हे राज्य भरताला मिळाले पाहिजे. तू राजमाता झाली पाहिजेस. तू दशरथाला मागणे माग. भरतासाठी राज्य मागून घे. आणि रामाला दूर वनवासाला पाठव."

कैकेयीला सुद्धा श्रीराम खूप आवडत होता. पण मंथरेने तिच्या मनात <u>विष भरले</u>. त्यामुळे तिला देखील रामाचा राग आला. तिने आपले दागिने काढून जमिनीवर फेकून दिले. रेशमी वस्त्रे काढून जुनी मळलेली वस्त्रे नेसली. तिने आपले केस <u>विस्कटले</u> आणि ती प्रासादात रडत बसली.

दशरथ मोठ्या आनंदाने कैकेयीला रामाच्या अभिषेकाची बातमी सांगायला आला. त्याने पहिले की कैकेयी रडत होती. त्याने कैकेयीला विचारले, "राणी, काय झाले? तू का रडती आहेस?"

कैकेयीने दशरथाला सांगितले, "तू रामाला राज्याभिषेक करू नकोस."

हे ऐकून दशरथाला <u>धक्काच बसला</u>. तो कैकेयीची <u>विनवणी</u> करू लागला. पूर्वी राजा दशरथाने कैकेयीला दोन वर दिले होते. कैकेयीने त्याला आता त्या दोन वरांची आठवण करून दिली. ती म्हणाली, "राजा, पहिल्या वराने तू भरताला अयोध्येचा राजा कर. आणि दुसऱ्या वराने रामाला चौदा वर्षे वनवासाला पाठव."


दिलेला <u>शब्द पाळण्याची</u> रघुवंशाची रीत होती. त्यामुळे दशरथाला तिची मागणी मान्य करावीच लागली. <u>दुःखी अंतःकरणाने</u> त्याने श्रीरामाला तिथे बोलावले. त्याला वनवासाला जायची आज्ञा केली. श्रीरामाने पित्याचे मन ओळखले. पित्याच्या आज्ञेचे पालन करणे हे <u>कर्तव्य</u> मानून तो वनवासाला निघाला.

श्रीरामाने दशरथाची तसेच माता कौसल्या आणि सुमित्रा यांची <u>समजूत घातली</u>. हे पाहून लक्ष्मणाला मात्र अतिशय संताप आला. रामाने त्याला <u>कसेबसे</u> शांत केले. शेवटी लक्ष्मण देखील रामाबरोबर वनवासाला निघाला.

Unrestricted

त्यानंतर श्रीराम सीतेचा निरोप घेण्यासाठी तिच्या प्रासादात गेला. त्याने सीतेला झालेला सर्व प्रकार सांगितला. सीता ते ऐकूनही शांत होती. मात्र ती म्हणाली, “तुझ्या बरोबर मीही वनवासाला येणार. जिथे श्रीराम तिथेच सीता.”

अखेर श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी तापसवेश धारण केला. त्यांनी दशरथ, कौसल्या, सुमित्रा आणि साऱ्या वडीलधाऱ्या मंडळींचा निरोप घेतला. त्यांनी अयोध्येच्या प्रजेचा निरोप घेतला आणि ते वनवासाला निघाले.



वाक्यात उपयोग करा:

संमतीने, विष भरणे, विस्कटणे, धक्का बसणे, समजूत घालणे, विनवणी करणे, कर्तव्य, कसेबसे

शिक्षकांसाठी:

1. खालील विषयांवर वर्गात चर्चा करणे:
    - प्रत्येकाचा स्वभाव कसा होता? दशरथ, कैकेयी, राम, लक्ष्मण, सीता.
    - अयोध्येत राहणे आणि वनात राहणे यात काय फरक असेल?
    - कर्तव्य म्हणजे काय? तुमचे कर्तव्य काय आहे?
2. विद्यार्थ्यांकडून वरील प्रसंगाचा नाट्याभिनय करून घेणे.
3. घरचे काम - दशरथाने कैकेयीला दिलेल्या वरांची गोष्ट आई-बाबांकडून ऐकणे.